साप्ताहिक

पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र...

# न्यायस्वातंत्र्य समता

संपादक : रमेश अ. शेळके

कार्यकारी संपादक : ॲड. चंद्रकांत गायकवाड

RNI NO.: MAHARAR/2010/36016

Website : nyayswatantryasamata.weebly.com

● वर्ष : ५ ● अंक : ४९ वा ● सोमवार दि. ४ जानेवारी ते १० जानेवारी २०१६ ● पुणे ● पाने : ४ ● किंमत २ रुपया

## संक्षिप्त बातम्या

### विधान परिषद निवडणुकीत मुंबईतून रामदास कदम, भाई जगताप विजयी

**मुंबई** : विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील सात जागांसाठीचे निकाल हाती आले. मुंबईतील दोन जागांवर शिवसेनेचे रामदास कदम आणि काँग्रेसचे भाई जगताप, कोल्हापूरमधून काँग्रेसचे सतेज पाटील, सोलापूरमध्ये शिवसेना-भाजप पुरस्कृत अपक्ष उमेदवार प्रशांत परिचारक, धुळे-नंदुरबारमध्ये काँग्रेसचे अमरिश पटेल, अहमदनगरमधून राष्ट्रवादीचे अरुण जगताप तर अकोल्यातून शिवसेनेचे गोपीकिशन बजोरिया यांच्या गळ्यात विजयाची माळ पडली.

विधान परिषद निवडणुकीत दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. मुंबई, कोल्हापूर, अहमदनगर, धुळे-नंदुरबार, सोलापूर आणि अकोला-वाशिम- बुलडाणाच्या जागांसाठी रविवारी निवडणूक झाली होती. एकूण २६२२ मतदारांपैकी २५८५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला होता. नागपूरच्या जागेवर भाजपच्या गिरिष व्यास यांची बिनविरोध निवड झाली आहे, तर उर्वरित जागांसाठी आज मतमोजणी झाली.

## 'समृद्ध'च्या कार्यालयांवर सीबीआयचे छापे

**पुणे (प्रतिनिधी)** : समृद्ध जीवन कंपनीचा प्रमुख महेश मोतेवारच्या समृद्ध जीवनच्या महाराष्ट्र आणि ओदिशातील तब्बल ५८ कार्यालयांवर सीबीआयने मंगळवारी छापे टाकून झाडाझडती घेतली. सीबीआयचे अधिकारी कार्यालयांमध्ये विविध कागदपत्रांची छाननी करीत आहेत.

त्यामुळे चिटफंड गैरव्यवहार प्रकरणी मोतेवारभोवतीचा फास आणखी आवळला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, डेअरी प्रकल्पात भागीदारीचे आमिष दाखवून ३५ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी महेश मोतेवारला उस्मानाबाद पोलिसांनी काल उमरगा न्यायालयासमोर हजर केले. यावेळी न्यायालयाने मोतेवारला ३१ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

ठेवीदारांकडून ठेवी स्वीकारण्यास सेबीने मनाई केल्यानंतरही अनेकांकडून गुंतवणूक स्वीकारल्याप्रकरणी मोतेवारसह त्याचे सहकारी वैशाली मोतेवार, घनश्याम पटेल, राजेंद्र भंडारे यांच्याविरुद्ध पुण्यातील डेक्कन आणि चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते.

सेबीचे सहाय्यक महाव्यवस्थापक सचिन सोनावणे यांनी यासंदर्भात नुकतीच फिर्याद दिली होती. तत्पूर्वी भागीदारीमध्ये फसवणूक केल्याच्या आरोपावरून उस्मानाबाद पोलिसांनी सोमवारी मोतेवारला पुण्यातून अटक केली होती. त्या पार्श्वभूमीवर सीबीआयने समृद्ध जीवन कंपनीच्या पुणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, ओदिशा येथील एकूण ५८ कार्यालयांवर छापे टाकले. स्वारगेटजवळील 'समृद्ध'चे मुख्य कार्यालय सीबीआयने सील केले.

कोट्यवधींचा चिटफंड घोटाळा महेश मोतेवारच्या समृद्ध जीवन कंपनीकडून कलेक्टिव्ह इन्व्हेस्टमेंट स्कीमद्वारे लोकांकडून आर्थिक गुंतवणूक, तसेच ठेवी घेण्यात येत होत्या, मात्र त्यासाठी सेबीची परवानगी घेण्यात आलेली नव्हती. त्यामुळे ही गुंतवणूक थांबविण्याचे आदेश सेबीने दिले होते. त्यानंतरही कंपनीने ठेवी स्वीकारल्या. त्यामुळे सेबीने कंपनीची चौकशी सुरू केली.

चौकशीदरम्यान कंपनीचे ऑडिट बुक, अकाऊंट बुक ताब्यात घेतले होते. त्यात सेबीने बजावलेल्या आदेशाचे उल्लंघन झाले. त्यानंतर सेबीने मोतेवारविरोधात डेक्कन पोलिसांत गुन्हा दाखल केला.

## वाहतुक विभागाकडून अनोख्या रथाद्वारे मद्यपींसाठी जनजागृती

**पुणे (प्रतिनिधी)** : मद्याच्या नशेत धुंद होऊन वाहन चालविणाऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी पुणे शहर वाहतुक विभागाच्या वतीने अनोखी शक्कल लढविण्यात आली आहे. वाहतुक विभागाकडून एका अनोख्या रथाची निर्मीती करण्यात आली असून त्या रथावर अपघाती वाहन ठेवण्यात आले आहे. व त्याखाली वाहनचालकांमध्ये जनजागृती करणारे संदेश लिहीण्यात आले आहेत.

नवीन वर्षाची सुरवात अपघात विरहीत होण्यासाठी पुणे शहर वाहतुक विभागाच्या वतीने ३१ डिसेंबरच्या रात्री दारु पिऊन गाडी चालविणाऱ्यांसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. या मोहिमेत निष्काळजीपणे व हयगयीने आणि वेगाने वाहन चालविणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मद्य प्राशन करुन वाहन चालविणाऱ्या, कर्कश हॉर्न वाजवून व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उचलण्यात येणार आहे. विना ड्रायव्हींग लायसन्स, विना रजिस्ट्रेशन आणि परवाना शर्तीचे भंग करणाऱ्या व वाहन चालविताना मोबाईल वर बोलणाऱ्या वाहनचालकांवरही या मोहिमेंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.




या विशेष मोहिमेचाच एक भाग म्हणून वाहतुक विभागाकडून एक अनोखा रथ तयार करण्यात आला असून त्या रथावर दारु पिऊन वाहन चालवित असताना झालेल्या अपघातातील एक गाडी ठेवण्यात आली असून त्याच्याखाली दारु पिऊन वाहन न चालविण्यासंदर्भात व वाहतुकीचे नियम पाळण्यासंदर्भात जनजागृती करणारे संदेश लिहीण्यात आले आहेत.

## ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांचे निधन

**मुंबई** : ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांचे बुधवार वृद्धापकाळाने मुंबईतील राहत्या घरी निधन झाले. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पाडगावकर यांच्या निधनाने मराठी रसिकांवर शोककळा पसरली आहे. मंगेश पाडगावकरांचा जन्म १९२९ साली वेंगुर्ल्यात झाला. त्यांनी मुंबई विद्यापीठातून मराठी व संस्कृत या भाषाविषयांत एम.ए. केले. ते काही काळ मुंबईच्या रुइया महाविद्यालयात मराठी भाषाविषय शिकवत होते.

पाडगावकर यांच्या अनेक कविता आणि गाणी प्रसिद्ध आहेत. मंगेश पाडगावकर यांच्या निधनाने मराठी साहित्यातील एक चमकता तारा निखळला आहे.

मंगेश पाडगावकर यांना सलाम या कवितासंग्रहासाठी यांना इ.स. १९८० साली साहित्य अकादमी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.



त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरवण्यात आले होते. २०१३ ला पद्मभूषण पुरस्कार तर महाराष्ट्र साहित्य परिषदेचा महाराष्ट्र साहित्य परिषद सन्मान पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले होते. २०१० साली संगमनेर येथील मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. तसेच २०१० सालचे विश्व साहित्य संमेलनाचेही अध्यक्षपद त्यांनी भुषविले.

## महिला कर्मचाऱ्यावर दोन कामगारांचा बलात्कार

**पुणे (प्रतिनिधी)** : हिंजवडी आयटी पार्कमधील इन्फोसिस कंपनीतील कॅन्टीनमध्ये काम करणाऱ्या एका महिला कर्मचाऱ्यावर हाऊसकिपिंगचे काम करणाऱ्या दोन कामगारांनी स्वच्छतागृहामध्ये बलात्कार केला. यावेळी तिचे छायाचित्रही काढण्यात आले. तसेच पोलिसांत तकार केल्यास छायाचित्र सोशल मीडियावर टाकण्याची धमकी दिली. दरम्यान, पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून हिंजवडी पोलिसांनी दोघा नराधमांना अटक करून शिवाजीनगर न्यायालयात हजर केले असता दोन्ही आरोपींना शुक्रवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

परितोष सुभाष बाग (२१, रा. लाला साखरे चाळ, हिंजवडी, मूळ-पश्चिम बंगाल) व प्रकाश किसन महाडिक (३०, रा. मारुती मंदिराजवळ, हिंजवडी) अशी अटक करण्यात आलेल्या नराधमांची नावे आहेत. पीड़ित महिला व आरोपी इन्फोसिस कंपनीत ठेकेदारी पद्धतीवर काम करतात. रविवारी (दि.२७) पीडित महिला नेहमीप्रमाणे कामावर होती.



ती कंपनीच्या स्वच्छतागृहामध्ये सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास गेली असता बाग हा तिच्या मागे गेला व त्याने तिच्यावर बलात्कार केला.

यावेळी त्याचा मित्र महाडिक याने आपल्या मोबाईलवर घटनेची छायाचित्रे काढली व या प्रकरणाची कोठे वाच्यता केली तर ही छायाचित्रे सोशल मीडियावर टाकून बदनामी करण्याची धमकी दिली. या घटनेनंतर घाबरलेल्या महिलेने कंपनीच्या प्रवेशद्वारावरील महिला सुरक्षा रक्षकांना हा प्रकार सांगितला. घरी परतल्यानंतर पतीला या घटनेची माहिती देत दुसऱ्या दिवशी हिंजवडी पोलिसांकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर पोलिसांनी दोन्ही नराधमांना गजाआड केले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेला मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे.

# संपादकीय...

## ही अखंड बडबड कधी थांबणार ?

भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांच्या हातात सत्ता आली आहे पण तिचा अर्थ त्यांना अजून म्हणावा तसा समजला नाही. असे खेदाने नमूद करावेसे वाटते. अजून राष्ट्रीय स्वयंसेवक संघटना ही अजून तळागाळापर्यंतसुध्दा पोहोचलेली नाही. परंतु हाती आलेल्या सत्तेचा वापर करून आपल्या संघ विचाराचे घोडे पुढे दामटण्याची उतावीळ घाई काही नेत्यांना झाली आहे. तिच्यामुळे देशात विनाकारण वाद निर्माण होत आहे. ज्याचे दुष्परिणाम भाजपा सरकारला आणि एकूण संघ परिवारालाच भोगावे लागणार आहेत. आपण जे काही बोलू त्याचा या देशातल्या विभिन्न पंथ आणि संप्रदायांच्या मनावर काय परिणाम होईल याचा फार जपून विचार करून तोलून मापून बोलले पाहिजे याचे भान बऱ्याच लोकांना नाही. अशा लोकांना पक्षात आणि सरकारमध्ये पदे मात्र मोठी मिळाली आहेत. भाजपाचे सरचिटणीस राम माधव यांनी आता आपण या मांदियाळीत असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांनी एक परदेशी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अखंड भारताचा नारा लावला. हा नारा काही चुकीचा नाही. अखंड भारत ही काही केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची कल्पना नाही. समाजवादी नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांनीही भारत आणि पाकिस्तान एक होऊ शकतील असे म्हटले होते. (डॉ. लोहिया हयात असेपर्यंत बांगला देश निर्माण झालेला नव्हता.) अखंड भारतामागे संघाची कल्पना अखंड हिंदुराष्ट्र अशी आहे पण व्यावहारिक पातळीवर ती सेक्युलर अखंड भारत अशी असण्याला काही हरकत नाही. कारण या देशाची फाळणी ब्रिटीशांनी घडवली आहे आणि ती काही जातीयवादी मुस्लिमांच्या मागणीवरून झाली आहे. तेव्हा फाळणीची चूक दुरुस्त करून हा देश पुन्हा कधीतरी एक देश म्हणून उभा राहू शकतो. ही काही अशक्य गोष्ट नाही. जगाच्या पाठीवर असे एकीकरण झालेले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया या जेत्या देशांनी पराभूत जर्मनीची पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनी अशी फाळणी केली होती. देशाची राजधानी बर्लीन हिचीही विभागणी करून पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग केले होते. विभागणी दाखवणारी मोठी भिंत या शहराच्या मध्यभागी उभारण्यात आली होती पण १९९० साली या दोन देशातल्या लोकांनाच आपला देश मुळात एक आहे याची जाणीव झाली आणि त्यांनी ही भिंत स्वत:च पाडली. दरम्यान ही फाळणी करणाऱ्या रशियालाच विघटनाने ग्रासले होते आणि अन्य तीन देश जर्मनीची फाळणी कायम करण्याच्या स्थितीत नव्हते. कारणे काहीही असतील पण एकदा विभाजित झालेला जर्मनी देश एक झाला. व्हिएतनामचेही असेच झाले. त्याची विभागणी उत्तर आणि दक्षिण व्हिएतनाम अशी करण्यात आली होती. मात्र या देशातल्या जनतेनेच पुन्हा एकत्रिकरण घडवून आणले. तसा प्रकार भारत आणि पाकिस्तान यांच्याबाबतीत होईल असा विश्वास अनेकांना वाटतो. त्यात अशक्य काहीही नाही. परंतु आज तरी अशा स्वप्नावर विश्वास ठेवावा एवढे सलोख्याचे संबंध या दोन देशात नाहीत. तरीही काही आशेचे किरण दिसतात. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या आग्रहावरून पूर्वी भारतीय क्रिकेट संघ पाकिस्तानात गेला होता. तेव्हा काही लोकांच्या मनात भारताविषयी शत्रुत्वाची भावना होती ही गोष्ट खरी परंतु भारताच्या क्रिकेटपटूंनी चौकार मारल्यास आनंदाने टाळ्या मारणाऱ्या पाकिस्तानी क्रिकेटप्रेमींची संख्याही काही कमी नव्हती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच पाकिस्तानला अचानक भेट दिली. तेव्हा त्यांच्या या भेटीचे हजारो पाकिस्तानी लोकांनी स्वागत केले. भारतातही काही लोक पाकिस्तानला कायम शत्रू राष्ट्र समजावे या मताचे असतात परंतु सर्वसाधारणतः जनतेचा कौल घेतला तर या दोन देशांनी सौहार्द्राने नांदावे असे वाटणाऱ्यांची संख्याही मोठी असते. भारत-पाकिस्तान यांच्या संबंधात सातत्याने कटुता येत असली तरी त्यांचे संबंध दृढ होतील अशी आशा वाटावी असेही प्रसंग अनेकदा येऊन गेले. त्या प्रसंगात व्यक्त झालेली भावना वाढवत गेली तर भारत-पाकिस्तान एक होऊन एक मोठा देश निर्माण होणे अशक्य वाटत नाही. परंतु मुख्य मुद्दा तो नाही. अशा प्रकारच्या चर्चा भाजपाच्या नेत्यांनी वाढवाव्यात अशी वेळ आली आहे का हा प्रश्न महत्त्वाचा आहे. अखंड भारत शक्य की अशक्य हा आजचा विषय नाही. कारण हे दोन देश एकत्र व्हावेत असा प्रस्ताव दोन्हीपैकी कोणत्याही देशाच्या सत्ताधारी नेत्यांनी मांडलेला नाही. आज भारतीय जनता पार्टीच्या सरकारला बदनाम करण्यास काही लोक टपले आहेत. नरेंद्र मोदी यांनी जनतेला विकासाचे स्वप्न दाखवून सत्ता मिळवली. परंतु त्या सत्तेचा वापर करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपले विचार पुढे दामटत आहेत, असे वातावरण देशात तयार केले जात आहे. ते वातावरण तयार करणाऱ्यांना भाजपाविरोधात प्रचार करण्याचे खाद्य आपण पुरवावे की नाही हा मुद्दा आज महत्त्वाचा आहे. राम माधव यांनी त्या दृष्टीने एक मोठी चूक केली आहे. अखंड भारत कधीतरी अस्तित्वात येईल असे म्हणून त्यांनी अपप्रचाराला संधी दिली आहे. त्यांची मुलाखत घेणाऱ्या प्रतिनिधीने अखंड भारताचा मुद्दा उपस्थित केला तेव्हा राम माधव या विषयावर मौन पाळू शकले असते. पण कधी मौन पाळावे हेच या लोकांना कळत नाही.

●●●

न्यायस्वातंत्र्य समता हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे-४११ ०५८ येथे छापून सर्व्हे नं.४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे-४११ ०४८ येथून प्रकाशित केले.
● (या अंकामध्ये छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत)

# राष्ट्रवादीची सत्ता म्हणजे भ्रष्टाचाराचे आगार : खा. अमर साबळे



**पिंपरी (प्रतिनिधी)** : पिंपरी चिंचवड महापालिकेतील राष्ट्रवादीची सत्ता हे भ्रष्टाचाराचे आगार असून, देशातील आणि राज्यातील सत्ता परिवर्तनानंतर पिंपरी-चिंचवड शहरात भाजप हा पक्ष पर्यायी सत्ताधारी पक्ष म्हणून अस्तित्वात येईल, असे मत खासदार अमर साबळे यांनी पिंपरी येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

तत्पुर्वी आज सकाळी (बुधवार) काळभोर नगर वॉर्ड क्र. २६ (अ)च्या पोटनिवडणूकीतील भारतीय जनता पार्टी आणि आरपीआय (आठवले गट) यांचे अधिकृत उमेदवार गणेश चंद्रकांत लंगोटे यांच्या प्रचाराचा शुभारंभ आकुर्डीतील खंडोबा मंदिर येथे आमदार लक्ष्मण जगताप यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी उमेदवार गणेश लंगोटे, खासदार अमर साबळे, भाजप शहराध्यक्ष सदाशिव खाडे, भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्षा शैला मोळक, महिला आघाडीच्या उमा खापरे, अमित गोरखे, आरपीआयच्या नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, आरपीआयचे महाराष्ट्र पश्चिम बाळासाहेब भागवत, आरपीआयचे शहराध्यक्ष सुधाकर वारभुवन, आरपीआयच्या शहर महिला कार्याध्यक्षा कमळ कांबळे, युवक सरचिटणीस दत्ता ठाणांबीर, भाजपाचे शहर सरचिटणीस राजू दुर्गे, अमोल थोरात आणि पोपट बोरकर, उदय नामदे, लक्ष्मण कोंडे, प्रकाश हगवणे, विठ्ठल कराळे, प्रमिला शेट्टी, संतोष गायकवाड, सुरज दळवी ज्येष्ठ नेते बाळासाहेब गव्हाणे, महेश कुलकर्णी, प्रमोद निसळ, प्रकाश जवळकर, राजेश पिल्ले, मोरेश्वर शेडगे, अनुप मोरे, नामदेव ढाके, माऊली थोरात, गणेश वाळुंजकर आदी उपस्थित होते. यानंतर काळभोर नगर मोहननगर परिसरातून लंगोटे यांच्या प्रचारार्थ प्रचार फेरी काढण्यात आली.

खासदार अमर साबळे यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड शहरातील तसेच राज्यातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सकारात्मक प्रयत्न करीत आहेत. याबाबत पक्षाकडून दिलेला शब्द पाळला जाईल, तसेच काळभोरनगरची पोटनिवडणूक ही 'लिटमस पेपर टेस्ट' असून यामध्ये भाजपचा उमेदवार निश्‍चित विजयी होईल. आगामी निवडणुकीत महापालिकेतील राष्ट्रवादीचा भ्रष्टाचार दाखवून देत भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये विश्वास वाढवून आगामी २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत महापालिकेत भाजपाचाच झेंडा फडकविला जाईल. भाजपाचे शहराध्यक्ष सदाशीव खाडे यांनी सदरची पोटनिवडणूक ही व्यक्ती विरोधात नसून राष्ट्रवादी विरोधात आहे. तसेच पक्षाच्या सामुहिक नेतृत्वाखाली लढवली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# अनधिकृत बांधकामावर कारवाई

**पुणे (प्रतिनिधी)** : पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभाग क्र.४,५ व ६ च्या वतीने अकरा मिळकतदारांनी केलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येवून सुमारे १८९०० चौ.फूट.क्षेत्र मोकळे करण्यात आले.

कारवाई अंतर्गत ढोले पाटील रोड व संगमवाडी टी.पी.एस, कोरेगाव पार्क लेन क्र.५ येथील शंकर पार्वती चेंबर्स मधील बेसमेंट कच्चे बांधकाम, ४००० स्के. फुट , हैद्राबादी तंदूर व चौपाटी हाऊस हॉटेल मधील कच्चे बांधकाम, १००० स्के. फुट, चैतन्य पराठा, निलम वाईन्स, घनश्याम पार्क मधील कच्चे बांधकाम १५०० स्के फूट, कोरेगाव पार्क लेन क्र.५ विद्युतनगर सोसायटी मधील कच्चे बांधकाम ६०० स्के फुट या मिळकतींवर कारवाई करण्यात आली.

शिवाजीनगर फा.प्लॉट नं.६२० येथील मिळकतीच्या विनापरवाना बांधकाम बोरावके चिकन येथील ६०० चौ.फूट, साई टी स्नॅक येथील ६०० चौ.फूट, रिगल शू स्टोअर्स १००० चौ.फूट, राजु संगवे यांचे ३०० चौ. फूट, संजय गाजरे यांचे १५० चौ. फूट, अशोक पाचपुते (एफ.सी.रोड) येथील ५०० चौ.फूट या मिळकतींवर कारवाई करण्यात आली.

कारवाईमध्ये २ गॅस कटर, १० बिगारी, १० पोलीस, १ जेसेबी तसेच अन्य कारवाईत बांबू, पत्रे, लोखंडी पाईप, पत्रा शेड, अॅंगल इत्यादीच्या साहाय्याने करण्यात आलेले बिगर परवाना बांधकाम पाडण्यात आले. सदर कारवाईकरिता उपअभियंता, शाखा अभियंता, पदनिर्देशित अधिकारी, सहाय्यक अभियंता, घरपाडी बिगारी १०, अतिक्रमण बिगारी ०५, पोलिस १ गट, इत्यादीच्या साहय्याने बांधकाम खात्यामार्फत कारवाई करण्यात आली.

बांधकाम विकास विभाग झोन क्र.४ व ५ च्या वतीने मुंढवा पासपोर्ट ऑफिस समोर व हडपसर मगरपट्टा रोड येथील फ्रंट मार्जिन मधील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली. कारवाई अंतर्गत मुंढवा पासपोर्ट ऑफिस समोर गंगा ऑरचिड बिल्डिंग फ्रंट मार्जिन (३८ दुकाने) यावर कारवाई करण्यात आली व ५७०० चौ.फूट मोकळे करण्यात आले. हडपसर मगरपट्टा रोड येथील फ्रंट माजिरन १८ ठिकाणा मधील ३८५० चौ.फूट क्षेत्र मोकळे करण्यात आले. एकुण ९५५० चौ.फूट क्षेत्र मोकळे करण्यात आले. सदरची कारवाई १५ बिगारी, १० पोलिस, १ जेसीबी यांच्या सहाय्याने करण्यात आली.

# अल्पवयीन मुलाने रचला स्वत:च्याच अपहरणाचा बनाव

**पुणे (प्रतिनिधी)** : सहामाही परिक्षेत नापास झाल्यामुळे अकरावीच्या मुलाने स्वत:च्याच अपहरणाचा बनाव रचल्याचा धक्कादायक प्रकार उघडकिस आला आहे. ही घटना खडक पोलिसांच्या तपासात उघड झाली आहे. याप्रकरणी सविस्तर माहिती अशी की, २८ डिसेंबर रोजी खडक पोलीस ठाण्यात सुवर्णा मसु धडे (वय, ३७) रा. निलायम टॉकीज जवळ यांनी फिर्याद दिली की, त्यांच्या अकरावीत शिकणाऱ्या १७ वर्षीय मुलाचे शिकवणी संपल्यानंतर घरी परतत असताना प्रणव लॉजच्या समोर व्हॉट्सअपवर चॅटिंग करत असताना मास्क घातलेल्या चार व्यक्तिंनी लाल रंगाच्या मारूती कारमधुन अपहरण केले. शिरवळ येथे गेल्यानंतर अपहरणकर्त्यांनी त्याचा फोटो काढुन तो व्हॉट्सअपद्वारे कोणालातरी पाठविला. मात्र समोरून रिप्लाय आला की त्यांनी दुसऱ्याच कोणाच्यातरी मुलाचे अपहरण केले आहे. त्यामुळे त्यांनी त्या मुलाला चालत्या गाडीतुन खाली ढकलले व त्याचा मोबाईल फेकुन दिला. नंतर त्याने कात्रज येथे येवून मला फोन केल्यानंतर मी त्याला कात्रज येथुन घेवून आले. हा सर्व प्रकार मी शिकवणीच्या सरांना भेटुन सांगितला व तक्रार देण्यासाठी खडक पोलिस ठाण्यात आले.

या प्रकरणाची पोलीसांनी गंभीर दखल घेत असा प्रकार परत घडू शकतो असा अंदाज बांधत चौकशीला सूरूवात केली. प्रथम त्यांनी प्रणव लॉजच्या सीसीटिव्ही कॅमेऱ्यात पाहणी केली असता त्यांना तसला काही प्रकार आढळुन आला नाही. याबाबत त्यानी अपहत मुलाकडे विचारणा केली असता त्याने सांगितले की अपहरण लॉजच्या फार पुढून झाले. यावेळी पोलिसांना त्याच्या तक्रारीविषयी शंका आली आणि त्यांनी त्याच्याकडे अधिक विचारणा केली असता खरा प्रकार उघडकिस आला.

त्या मुलाचे दहावीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातुन झाले होते पण आईच्या आग्रहास्तव त्याने अकरावीला इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतला होता. मराठी माध्यमातुन शिक्षण झाल्यामुळे त्याला इंग्रजी माध्यमातील शिक्षण जड जात होते. कॉलेजच्या सहामाही परिक्षेत तो इंग्रजी सोडुन इतर सर्व विषयात नापास झाला होता. वार्षिक परिक्षेतदेखील नापास होवुन बारावीची परिक्षा देता येणार नाही याची चिंता त्याला सतावत होती. म्हणुन त्याने स्वत:च्याच अपहरणाचा बनाव रचला.

पाचगणी शांत ठिकाण असल्याचे त्याने कुठेतरी ऐकले होते. त्यामुळे त्याने पाचगणीला जाण्याचा विचार करून स्वारगेट वरून भिवंडी ते महाबळेश्वर बसने तिकडे निघाला. काही वेळाने त्याला आपण कुठे तरी दुर जात असल्याची जाणीव झाली तेव्हा बसमधून उतरत त्याने आईला फोन करून स्वत:च्या अपहरणाचा बनाव सांगितला.

# शेतकऱ्यांच्या मुलांनी निर्यातदार व्हावे यासाठी प्रशिक्षण वर्ग : डॉ. सोनावणे

**पुणे (प्रतिनिधी) :** निर्यात व्यवसाय हा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या कुटुंबांपर्यंत पोहोचून त्याचा आर्थिक लाभ थेट शेतकऱ्यांना मिळावा यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन केले असल्याचे मनोगत कृषि पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक, डॉ.प्रशांत सोनवणे यांनी आज व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ व अपेडा यांच्या संयुक्त विद्यमाने हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स पाच दिवसीय निवासी अभ्यासक्रमाचे उद्घाटन डॉ सोनावणे यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपसरव्यवस्थापक (वित्त व लेखा), जितेंद्र कोळंबे,




उपसरव्यवस्थापक (अभियांत्रिकी), ओ. व्ही.निला, सहाय्यक सरव्यवस्थापक, डॉ.भास्कर पाटील उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉ.प्रशांत सोनवणे म्हणाले शेतकरी कुटुंबातील बेरोजगार तरुणांना निर्यातीसारख्या क्षेत्राचे प्रशिक्षण देऊन त्यांना उद्योजक करण्यासाठी कृषि पणन मंडळाने हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स सुरु केलेला आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन प्रत्यक्ष निर्यातदार होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रशिक्षणात फळे व भाजीपाला निर्यात संधी, शिपींग डॉक्युमेंटस, गुणवत्ता मानके, वाहतुक व पुरवठा यंत्रणा, शासनाच्या विविध योजना, प्रक्रिया पध्दती, विविध देशांचे निकष, ब्रँण्डींग, टर्मिनॉलॉजी व पेमेंट रिस्क, करार शेती, इ. विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक सरव्यवस्थापक (निर्यात), दिगंबर साबळे यांनी केले तर आभार अनंत सावरकर यांनी मानले.

# बाळू वाघेरे टोळीच्या तिघांना पिस्तुलासह अटक

**पुणे (प्रतिनिधी) :** पिंपरी-चिंचवडमधील कुख्यात बाळू वाघेरे टोळीतील तिघांना अँन्टी गुंडा स्कॉडच्या पथकाने अटक केली. यावेळी त्यांच्याकडून एक पिस्तुल व ४ जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आले आहे.देविदास काळूराम नखाते (वय-४०, रा. गजानन कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, रहाटणी), निखील बाळकृष्ण काळे (वय -२४, रा. तलाठी कार्यालयासमोर, रहाटणी) व संजय बाबुराव देशमुख (वय-३०,रा. टेम्पो चौक, वडगाव शेरी) या तिघांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर प्रादेशिक विभागांतर्गत कार्यरत असलेल्या पाच सक्रीय संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील सदस्यांवर गुंडा स्कॉडकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. त्यांच्या हालचालींची माहिती घेत



असता पोलीस नाईक सचिन जाधव यांना माहिती मिळाली की, बाळू वाघेरे टोळीतील दोघेजण चिंचवड येथील खुशबु हॉटेलच्या परिसरात येणार असून त्यांच्याकडे देशी बनावटीचे पिस्तुल आहे. मिळालेल्या माहितीनुसार गुंडा स्कॉड पथकाने परिसरात सापळा रचून नखाते व काळे या दोघांना जेरबंद केले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याजवळून एक देशी बनावटीचे पिस्तुल व चार जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.

त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता हे पिस्तुल त्यांनी वडगाव शेरी येथील संजय देशमुख याच्याकडून विकत घेतल्याचे कबूल केले. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी देशमुख याला अटक केली.

नखाते व देशमुख हे कुख्यात बाळू वाघेरे टोळीतील सक्रीय गुन्हेगार असून त्यांच्याविरोधात पुणे शहरातील विविध पोलीस ठाण्यात खुन, खुनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक मिलिंद गायकवाड, सहायक पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे, सचिन जाधव, शैलेश नाईक, तेजस चोपडे, तानाजी कांबळे, कृष्णा बढे, कांता बनसुडे, सलीम पठाण, अमित जाधव, दिनेश साबळे, शितल शिंदे, मयुर शिंदे यांच्या पथकाने केली.

## ऑनलाईन शॉपिंगला विमॅक्स डॉट कॉमची साथ

**पुणे (प्रतिनिधी) :** बिझनेस टेक्नॉलॉजीच्यावतीने विमॅक्स डॉट कॉम या ई-कॉमर्सची पोर्टलची निमिर्ती करण्यात आली आहे. या पोर्टलने ग्राहकांना कार्यक्रम, समारंभासाठी हॉल किंवा म्युझिक बॅन्ड, डॉक्टरची वेळ आवडती वस्तू कुठे कमी दरात मिळेल या दुकांनाची माहिती मिळणार आहे. अशी माहिती कंपनीचे संचालक राजकुमार कोंडे यांनी दिली. सध्या ऑनलाईन शॉपिग मोठ्या प्रमाणात केली जाते. पण ऑनलाईन विकल्या जाणाऱ्या वस्तूंची माहिती किंवा त्या कुठे मिळणार याची उपलब्धता पोर्टलवर अधिक प्रमाणात नसते. प्रत्येक ग्राहकांच्या गरजा वेगळ्या असतात. त्या गरजांनुसार सेवांचे पर्याय पोर्टलवर उपलब्ध नसतात, आता त्या विमॅक्स डॉट कॉम या पोर्टलने उपलब्ध होणार आहे. १ जानेवारीपासून हे पोर्टल सुरु होणार आहे.

# अक्षयकुमारकडून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदत जमा

**उस्मानाबाद :** मिस्टर खिलाडी अशी ओळख असलेला अभिनेता अक्षय कुमार याने दुष्काळग्रस्तांनाही मदत देऊनही तो खऱ्या आयुष्यातसुद्धा सुपरहिरोच असल्याचे दाखवून दिले आहे. त्याने मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयाना प्रत्येकी ५० हजारांची मदत देऊ केली आहे. त्यानुसार ३० शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट धनादेशाच्या माध्यमातून प्रत्येकी ५० हजार रुपये जमा झाले आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्यातील २० शेतकऱ्यांना आतापर्यंत मदत पोचली असून दहा जणांना काही तांत्रिक अडचणींमुळे ती मिळालेली नाही. मात्र त्यांनाही ही मदत लवकरच मिळणार आहे. मराठवाड्यातील भीषण दुष्काळामुळे काहींनी जीवनयात्रा संपविली. यात त्यांच्या कुटुंबाचा आधार हिरावला आहे. अशावेळी मदत देण्याची सामाजिक बांधिलकी दाखविणारे काही हात पुढे आले. त्यातील एक हात म्हणजे अक्षय कुमार या सुपरस्टारचा.

एका कार्यक्रमादरम्यान विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील व अक्षय कुमार यांची भेट झाली होती. त्यावेळी मराठवाड्यातील दुष्काळाबद्दल नांगरे पाटील यांनी अक्षयकुमारला माहिती दिली. अक्षयकुमारने त्याचवेळी नांगरे पाटील यांच्याकडे शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत करण्याची इच्छा दर्शवली. काही दिवसांनी अक्षयकुमारच्या कार्यालयातून नांगरे पाटील यांच्याकडून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांची यादी मागिवण्यात आली. या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यातून ३० जणांची यादी करण्यात आली व त्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० हजारांची आर्थिक मदत देण्यात आली.

# महाविद्यालयांच्या तपासणीला शिक्षण आयुक्तांचा हिरवा कंदील

**पुणे (प्रतिनिधी) :** विभागीय उपसंचालक कार्यालयाकडून डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये पुणे जिल्हा, पिंपरी चिंचवड आणि नगर येथील सुमारे अकरा महाविद्यालयांची अचानक तपासणी करण्यात आली.

या तपासणी दरम्यान भरारी पथकांतील सदस्यांकडून गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी आल्याचे सांगत महाविद्यालयांची तपासणी मोहीम ताबडतोब थांबवा, असे आदेश राज्याचे शिक्षण आयुक्तांनी दिले होते. परंतु, या निर्णयावर उलटसुलट चर्चा सुरू झाल्यानंतर महाविद्यालयांच्या तपासणीला पुन्हा परवानगी देण्यात आली. राज्यातील विभागीय उपसंचालक कार्यालयांकडून त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयांची अचानक तपासणी करण्यासाठी विशेष भरारी पथके नेमण्यात येतात. त्यामध्ये विषयनिहाय प्राध्यापकांद्वारे प्रत्यक्ष तासिका पाहणी करणे.

महाविद्यालयांचे जनरल रजिस्टर तपासणी, विद्यार्थी, शिक्षकांचे हजेरी पत्रके, निकालपत्रके, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मान्यतांचे अभिलेख, सेवापुस्तके, वैयक्तिक नस्ती, पगारपत्रके, ग्रंथालय रजिस्टर, अग्निशमन यंत्रणा, पायाभूत सुविधा, लेखा विभागातील सर्व महत्त्वाच्या फाईल्स यांची तपासणी केली जाते.

पुणे विभागीय उपसंचालक कार्यालयाच्या माध्यमातून पुणे जिल्हा, पिंपरी चिंचवड आणि अहमदनगर येथील सुमारे अकरा महाविद्यालयांची अचानक तपासणी करण्यात आली. मात्र, या तपासणी दरम्यान भरारी पथकांतील सदस्यांद्वारे प्राचार्य, शिक्षकांमध्ये दहशत निर्माण केली जाते. तसेच, काही गैरप्रकारही केले जात असल्याचे कारण देत शिक्षण आयुक्तांनी महाविद्यालय तपासणी थांबविण्याचे आदेश दिले होते.

विभागीय उपसंचालक कार्यालयाकडून ज्या त्या विषयाच्या प्राध्यापकांचे तपासणी पथक तयार करण्यात येते. त्यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष तासिका पाहणी केली जाते. त्यातील निरीक्षणे व सूचना दिल्या जातात. तर सहायक शिक्षण संचालक व शिक्षणाधिकाऱ्यांद्वारे कार्यालयीन दप्तर तपासणी केली जाते.

शिक्षण आयुक्तांनी पुढील सूचना येईपर्यंत महाविद्यालय तपासणी थांबविण्याचे आदेश दिले होते. परंतु आज शिक्षण आयुक्तकार्यालयाकडून स्वतंत्र यंत्रणा तयार करून पुन्हा महाविद्यालयांची तपासणी करण्यास परवानगी दिली असल्याची माहिती विभागीय उपसंचालक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिली.

## संक्षिप्त बातम्या

### खडकीत भरदिवसा तरुणाचा खून

**पिंपरी (प्रतिनिधी) :** एमआयटी स्कूल ऑफ टेलिकॉम मॅनेजमेंट तर्फे नुकतेच पुण्यात ४जी व ५ जी तंत्रज्ञानावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिकागो येथील ईलीनॉयस इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजीचे वरिष्ठ प्रा.डॉ.सुरेश बोरकर हे प्रमुख वक्ते होते.मिटसॉटचे प्रकल्प संचालक मिलिंद पांडे उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना डॉ.सुरेश बोरकर म्हणाले की, स्मार्ट सिटीसाठी ४जी व ५जी तंत्रज्ञानाचे लवकर अंगीकरण करणे महत्त्वाचे ठरेल. स्मार्ट सिटीमधील विविध योजना यशस्वी करण्यासाठी याचा महत्त्वाचा वाटा असेल. यामध्ये या तंत्रज्ञानांमुळे उपलब्ध होणारा क्लाऊड डेटा हा उपयुक्त ठरेल.

### रुग्णांना मिळणार शस्त्रक्रियेसाठी ईएमआय

**पुणे :** सांधेरोपणासाठी आणि मणक्याच्या शस्त्रक्रियेसाठी नागरिकांना अधिक प्रमाणात पैसे मोजावे लागतात, त्यामुळे नागरिकांना आर्थिक अडचण जाणवत असते, तर कधी पैशांअभावी रुग्ण शस्त्रक्रिया करणे टाळत असतो. यासाठी गरजू व्यक्तींना साईश्री हॉस्पिटलतर्फे इएमआय मिळणार आहे. कर्जात पूर्ण वैद्यकीय खर्च समाविष्ट केलेला असून याचे वार्षिक व्याजदर ० ते ६ टक्के आहे. तर परतफेड कालावधी हा १२ महिने ते ४८ महिने असा आहे. यानिमित्त साईश्री हॉस्पिटलतर्फे औंध येथील सेंटर येथे रविवारी ३ जानेवारी रोजी सांधेरोपण व मणक्यांचे शस्त्रक्रिया शिबिर आयोजित केले आहे.

### बिल देण्याच्या वादातून मित्रानेच केली मित्राची हत्या

**पिंपरी (प्रतिनिधी) :** जुन्नरमध्ये हॉटेलचे बिल देण्याच्या वादातून मित्रानेच मित्राचा खून केल्याची घटना जुन्नर जवळील काळे पेट्रोल पंपाच्या मागे रविवारी रात्री ९ वाजता घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघे मित्र जेवण करायला जुन्नरच्या हॉटेलमध्ये रविवारी रात्री गेले होते. बिल देण्याच्या वादातून दोन्ही मित्रांमध्ये वाद विवाद झाले. वाद इतका वाढला की आरोपी सुभाष शेटीबा लष्करे (वय २८) याने आपला मित्र सागर दिनकर गाडेकर (वय २५) याच्या डोक्यात वरवंटा घालून हत्या केली. हत्या केल्यानंतर सुभाष स्वतः पोलीस स्टेशनमध्ये हजर झाला.

### सांगवीमध्ये साखळी चोरीची घटना

**पिंपरी :** जुनी सांगवीमध्ये मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसमांनी पायी जात एक महिलाचे गळयातील सोन्याची साखळी जबरदस्ती हिसकावल्याची घटना घडली. ही घटना रविवारी सायंकाळी साडेपाच वाजता घडली. याबाबत एक ७६ वर्षीय महिलेने यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिला रविवारी पायी जात होती. मागून दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळयातील ६९ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या दोन साखळ्या जबरदस्तीने हिसका मारून पळवून नेल्या.

# केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली : अशोक चव्हाण

**पुणे (प्रतिनिधी) :** राज्यामध्ये तीन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असताना केवळ तीन हजार कोटी रुपये केंद्रातील भाजप सरकारने देऊन राज्याच्या शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांनी काल केली. यावेळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष अभय छाजेड, युवक प्रदेशाध्यक्ष विश्वजित कदम, मोहन जोशी, नगरसेवक अविनाश बागवे, नरुद्दीन सोमजी, नीता परदेशी आदी उपस्थित होते.

यावेळी चव्हाण म्हणाले, केंद्रातील आणि राज्यातील भाजप सरकारने शेतकऱ्यांचा आणि दुष्काळाचा विचार केलेला नाही. वास्तविक शेतकऱ्यांची कर्जमाफी,आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना




मदत, एफआरपीचा फरक अशा पद्धतीने १० ते १५ हजार कोटी रुपये राज्याला मिळाले पाहिजे होते. केवळ तीन हजार कोटी रुपये देण्यात आले असून, राज्यातील नेते हुरळून गेल्याप्रमाणे केंद्राचे आभार मानत आहेत. राज्यात १९७२ नंतरचा सर्वात मोठा दुष्काळ आहे. सात ते आठ महिने केंद्राकडे म दतीसाठी पाठपुरावा करण्यात येत होता, असे ते म्हणाले.

रेल्वेमंत्र्यांनी रेल्वे अंदाजपत्रक सादर करण्याच्या अगोदरच तत्काळ तिकिटामध्ये भाडेवाढ केली आहे. अंदाजपत्रकावर टीका होऊ नये यासाठी त्यांनी असा निर्णय घेतला असावा. शासकीय रुग्णालयामध्ये सर्वसामान्य नागरिक उपचार घेत असतो. त्याचे दर वाढवण्याचे काम भाजपने केले आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांचा विचारच हे सरकार करत नसल्याची टीका चव्हाण यांनी केली.

# सूर्यदत्त मध्ये भरलेल्या अंतर्गत सजावट व अंतराळ विश्व ऑरा २०१५ या प्रदर्शनास सूरुवात

पुणे (प्रतिनिधी) : डिझाइनिंग तर्फे भरविण्यात आलेल्या अंतर्गत सजावट व अंतराळ विश्व ऑरा २०१५ या प्रदर्शनाचे उद्घाटन समाजसेविका लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांच्या हस्ते आज करण्यात आले. या प्रसंगी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ.संजय चोरडिया,सुषमा चोरडीया व ज्येष्ठ चित्रकार जयप्रकाश जगताप उपस्थित होते.

या प्रदर्शनात कॉलेजमधिल विद्यार्थ्यांनी केलेल्या अभ्यासांतर्गत घर सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तु, सदनिका, बंगला,कार्यालय, बँक, उपाहारगृह, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र इत्यादी साठी लागणारे आराखडे, संदर्भ, मॉडेल्स व आंतरराष्ट्रीय दर्जानुसार माहिती प्रदर्शित करण्यात आली आहे.

अंतराळ विश्व विभागात अंतराळातील दुनियेची झलक, मानवाने केलेल्या प्रगतीचा उलगडा, स्पेस सेंटर, सॅटेलाइट आणि विविध आंतराळ वीर यांचा माहिती संग्रह प्रदर्शीत केले आहेत.



सामान्य माणसे व मुलांना अंतराळ हा विषय समजावून घेण्यासाठी हे प्रदर्शन उत्तम आहे.

विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमात नसलेल्या अंतराळ या विषयावर प्रदर्शन भरविण्याचे मोठे आवाहन होते. अहोरात्र मेहनत घेऊन त्यांनी हे प्रदर्शन यशस्वी रित्या सादर केल्याबद्दल प्रा. डॉ.संजय चोरडीया यांनी सर्वाचे अभिनंदन केले. उत्तम कार्किर्दीसाठी त्या विषयासंबंधी संपूर्ण ज्ञान, त्यातील नवनविन कल्पना, प्रत्यक्ष अनूभव, तीव्र इच्छा व संधी या गोष्टी आवश्यक असतात. जागतिक पातळीवर यश मिळविण्यासाठी प्रत्येकाने कठोर परिश्रम करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले.

प्रा.अजित शिंदे यांनी संस्थेविषयी माहिती दिली व ते म्हणाले प्रात्याक्षिकाद्वारे मुलांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन देणे, त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक व्हावे म्हणून अशी प्रदर्शने गेली १२ वर्षे भरविली जात आहेत.

टाकाऊ वस्तुपासून केलेल्या अंतराळ या प्रदर्शनामध्ये विद्यार्थांनी कचरा व्यवस्थापनाचा चांगला उपयोग शैज्ञणिक ज्ञान वाढविण्यासाठी केल्याबद्दल लक्ष्मी त्रिपाठी यांनी सर्वांचे अभिनंदन केले. वाढती लोकसंख्या व मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे त्या मुळे जागेचा प्रश्न गंभीर होत असून त्या साठी मोठी किंमत मोजावी लागत आहे. विद्यार्थ्यांनी नविन काम करतांना याचा जरूर विचार करावा. सतत कामात झोकून दिल्यास यश तुमच्याबरोबर आपोआप येईल असा मौलिक सल्लाही त्यांनी सर्वाना दिला.

जयप्रकाश जगताप म्हणाले यशस्वी कारकीर्दीसाठी जसा संगीत अथवा नृत्याचा सराव आवश्यक असतो तसाच चित्रकलेचा सराव करणे गरजेचे आहे. कुठल्याही गोष्टींचा सखोल अभ्यास केल्यास हमखास यश मिळते.

हे प्रदर्शन पुणे इन्स्टीट्यूट ऑफ अप्लाइड टेक्नॉलॉजी २०४१/४२ सदाशिव पेठ, निखिल प्राइड बिल्डींग, अभिनव कला विद्यालया शेजारी, टिळक रोड येथे भरले आहे. प्रदर्शन ३० डिसेंबर पर्यत सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यत सर्वासाठी खुले आहे.

## संक्षिप्त बातम्या

### गटारांवरील साडेचारशे झाकणांची दुरूस्ती

**पुणे (प्रतिनिधी) :** शहरातील वेगवेगळे रस्ते आणि पावसाळी गटारांवरील चेंबरची सुमारे नऊशे झाकणे (ड्रेनेज) धोकादायक असल्याचे महापालिकेने केलेल्या पाहणीत आढळून आले आहे. त्यातील निम्म्या म्हणजे, साडेचारशे झाकणांची दुरुस्ती करण्यात आली असून पुढील दोन महिन्यांत उर्वरित झाकणांची दुरुस्ती होणार आहे. लोकांच्या तक्रारी आणि रस्ते विभागाने केलेल्या पाहणीनुसार नादुरुस्त असलेल्या ड्रेनेजच्या झाकणांची प्राधान्याने दुरुस्ती करण्यात येत असल्याचे महापालिका प्रशासनाने मंगळवारी सांगितले.

### काळभोर नगरला बुधवारी भाजपाचा प्रचाराचा शुभारंभ

**पिंपरी (प्रतिनिधी) :** भारती जनता पार्टी आणि आरपीआय (आठवले गट) यांचे अधिकृत उमेदवार गणेश चंद्रकांत लंगोटे यांच्या प्रचाराचा शुभारंभ बुधवार दि. ३० डिसेंबर २०१५ रोजी सकाळी १० वा. आकुर्डीतील खंडोबा मंदिर येथून करण्यात येणार आहे. अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष सदाशिव खाडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे. काळभोर नगर वॉर्ड क्र. २६ (अ) च्या पोटनिवडणूकीत भाजपाने गणेश लंगोटे यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. त्यांच्या प्रचाराचा शुभारंभ खासदार अमर साबळे आणि आमदार लक्ष्मण जगताप यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात येणार आहे. यावेळी राज्यलेखा समितीचे अध्यक्ष ड. सचिन पटवर्धन, पश्चिम महाराष्ट्र भाजपा संपर्क प्रमुख एकनाथ पवार, आरपीआयच्या नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, महिला आघाडीच्या उमा खापरे आणि शहर भाजपाचे सर्व पदाधिकारी, सर्व सेलचे प्रमुख पदाधिकारी युवा कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. अशीही माहिती खाडे यांनी दिली आहे.

# साहित्य संमेलन १५ ते १८ जानेवारी दरम्यान; शरद पवारांच्या हस्ते उद्घाटन

**पिंपरी (प्रतिनिधी) :** ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १५ ते १८ जानेवारी दरम्यान पिंपरीतील हिंदुस्थान ॲन्टीबायोटिक्स (एचए) मैदानावर भरणार आहे. संमेलनाचे उद्घाटन १६ जानेवारी रोजी माजी केंद्रीय कृषी मंत्री आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता होणार असल्याची माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष पी. डी. पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेला अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, कोषाध्यक्ष सुनील महाजन यांच्यासह महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

माधवी वैद्य यांनी संमेलनाचा




कार्यक्रम जाहीर केला. १५ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता ग्रंथदिंडी निघणार असून दिंडीचे पूजन सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी ज्ञानेश्वर मुळे, गिरीश प्रभुणे आणि डॉ. रामचंद्र देखणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याच दिवशी दुपारी पावणेपाच वाजता डॉ. माधवी वैद्य आणि पी. डी. पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे. सायंकाळी पाच वाजता ग्रंथप्रदर्शनाचे ८८ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून माजी संमेलनाध्यक्षांचा सत्कारही यावेळी करण्यात येणार आहे.

संमेलनाचे उद्घाटन १६ जानेवारीला शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. डी. वाय. पाटील, ज्येष्ठ गीतकार गुलझाल, पालकमंत्री गिरीश बापट, सदानंद मोरे, पिंपरी-चिंचवडच्या महापौर शकुंतला धराडे यांच्यासह ज्ञानपीठ पुरस्कार विजेते सत्यव्रत शास्त्री, रेहमान राही, केदारनाथ सिंह, सीताकांत महापात्र हे उपस्थित राहणार आहेत.

संमेलनामध्ये विविध विषयांवरील ११ परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये उद्योगनगरीत संमेलन भरत असल्यामुळे 'मराठी साहित्यातील उद्योगजगताचे चित्र आणि महाराष्ट्रातील उद्योजक' या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय अभिजात कथावाचन, कथाकथन, निमंत्रितांचे कविसंमेलन, ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानीत लेखकांशी संवाद, बहुभाजिक कविसंमेलन, ज्येष्ठ गायिका आशा भोसले संगीत रजनी, तरुणांसाठी खास चेतन भगत यांच्याशी संवाद, मुलांसाठी मामाच्या गावाला जाऊया या कार्यक्रम आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्यासह गुलझार, शरद पवार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांच्या मुलाखती होणार असून उपस्थितांना संदीप वासलेकर, ज्ञानेश्वर मुळे, श्रीनिवास दैठणकर, अच्युत गोडबोले यांच्याशी संवाद साधता येणार आहे.

संमेलनाचा समारोप १८ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता केंद्रीय रस्ते वाहतूक व जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी, राज्याचे शालेय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे आणि ज्येष्ठ कवी व गीतकार जावेद अख्तर यांच्या उपस्थितीत होणार आहे. समारोप समारंभानंतर अशोक हांडे निर्मित मंगलगाणी-दंगलगाणी कार्यक्रम होणार आहे.